ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 9 | MAY - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# वारकरी संप्रदायातील काही संतांचे कार्य: एक अभ्यास



**प्रा. सुमन लक्ष्मनराव केंद्रे**
**इतिहास विभाग , कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,पंढरपूर.**
**ता. पंढरपूर, जि. सोलापूर.**

**प्रस्तावना:**

मध्ययुगीन काळामध्ये महाराष्ट्रात भक्तीपंथ हे प्रामुख्याने विष्णू व शिव या दोन देवता भोवती केंद्रित झाल्यचे दिसून येतात. शैव व वैष्णव पंथांनी भक्ति संप्रदाय अधिक बळकट केला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात या पंथांनी भक्तीचा प्रसार केलेला दिसून येतो. या पंथांनी हिंदू धर्माला कर्मकांडापासून मुक्त केले जातिभेद कमी केले. भौतिक दुरावस्था व मानसिक गुलामगिरी यांच्या कचाट्यातून समाजाला सोडविले. व्यक्तीच्या अध्यात्मिक उन्नतीबरोबरच सामाजिक एकता व समता या भक्ती चळवळीमुळे घडून आली. या भक्ति चळवळीमध्ये जे पाच संप्रदाय उदयाला आले त्यामध्ये वारकरी संप्रदाय म्हणजेच भागवत संप्रदाय मध्ययुगीन काळात प्रसिद्धीला आला.

भागवत पंथ म्हणजेच वारकरी किंवा माळकरी पंथ होय. जे दरवर्षी पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी जातात. वारकऱ्यांच्या या भक्ति संप्रदायालाच वारकरी पंथ असे म्हणतात. पण वारकऱ्यांना माळकरी म्हणण्याचे कारण असे की पांडुरंगाला प्रिय असणारी तुळशीची माळ ते आपल्या गळ्यात धारण करतात. भागवत पंथ असे नाव पडण्याचे कारण म्हणजे भगवंताला आपले सर्वस्व म्हणजे तन, मन, धन अर्पण करणारा तो भक्त म्हणजे भागवत. या भक्ताचे भगवंताविषयीचे आचार,विचार, तत्वज्ञान व भक्तिमार्ग म्हणजेच भक्ती चळवळ किंवा भागवत पथ होय. महाराष्ट्रात असणाऱ्या इतर पंथांच्या तुलनेत भक्ति संप्रदाय हा व्यापक, विस्तृत ,प्रभावी आहे. महाराष्ट्रातील सुशिक्षित, अशिक्षित, ब्राह्मण व हरिजन, स्त्री-पुरुष, बाल, वृद्ध, खेडूत, नागरी अशा सर्व प्रकारच्या भक्तिसमूहाच्या हृदयाची पकड घेणारा हा पंथ आहे.

ज्ञानेश्वरांनी भागवत संप्रदायाला खरी चालना दिली म्हणजे या भक्ति चळवळीचा पाया घातला तर संत नामदेवांनी भक्ति प्रसाराचे महत्वपूर्ण कार्य केले. शिवाय याच काळात निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई, चांगदेव, गोरा कुंभार, नरहरी सोनार, सावता माळी, परिसा भागवत, संत जनाबाई, चोखामेळा, सेना न्हावी यासारखे अनेक महत्त्वपूर्ण संत होऊन गेले. प्रत्येक जण आपापल्या गुण वैशिष्टयाने महान विठ्ठल भक्त होते. त्यांनी भक्ति बरोबरच समाजसेवाही केली. त्यापैकी काही संतांचे कार्य पुढील प्रमाणे.

अगदी पुंडलिका पासून ते ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ महाराज आणि तुकाराम महाराज या संतांनी भागवत संप्रदायाचा मोठ्या प्रमाणात प्रचार आणि प्रसार केला. याबद्दल संत बहिणाबाई म्हणतात.

संत कृपा झाली / इमारत फळा आली
ज्ञानदेवे रचिला पाया / उभारीले देवालया
नामा तयाचा किंकर / तेने केला हा विस्तार
जनार्दन एकनाथ / ध्वज उभारीला भागवत
भजन करा सावकाश / तुका झालासे कळस.

**भक्त पुंडलिक:**

या वारकरी संप्रदायाची किंवा भागवत पंथाची सुरुवात भक्त पुंडलिका पासून झाली. पुंडलिक हा सुरुवातीला चैनी आणि विलासी होता. परंतु कुक्कुट स्वामींच्या मार्गदर्शनाने व सहवासाने पुंडलिकाच्या स्वभावात परिवर्तन झाले होते . पंढरपुर येथे तो आई-वडिलांची सेवा करू लागला जेव्हा प्रत्यक्ष पांडुरंग त्याच्या भेटीसाठी आले तेव्हा पुंडलिकाने एक वीट फेकली व त्या विटेवर उभे राहावे व युवानुयुगे इथेच राहून अज्ञानी, गोरगरीब अशा सर्व प्रकारच्या भक्तांचा उद्धार करावा, अशी विनंती केली. पांडुरंगांनी आपल्या या भक्ताची विनंती मान्य केली अशी कथा सांगितली जाते.

**संत ज्ञानेश्वर:**

भागवत धर्माचा महाराष्ट्रात पाया घालणारे संत ज्ञानदेव होय. इसवी सन १२७५ मध्ये विठ्ठलपंत व रुक्मिणी यांच्या पोटी ज्ञानदेवाचा जन्म झाला. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई ही चार भावंडे महाराष्ट्रात भक्ती संप्रदायात सर्वश्रेष्ठ मानली जातात. ज्ञानदेव हे नाथपंथी होते तसेच ते बालब्रह्मचारी, प्रपंच आगर संसाराचा अंश मात्र स्पर्श न झालेले अभूतपूर्व व्यक्तिमत्व होते. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भगवतगीतेवर ज्ञानेश्वरी या नावाचा ग्रंथ लिहिला. यामध्ये भगवतगीतेतील तत्त्वज्ञानावर विस्तृत अशी चर्चा केली आहे. हा ग्रंथ त्यांनी मराठी भाषेतून लिहिला असल्यामुळे सर्वसामान्य व्यक्तीला गीतेतील भावार्थ समजण्यास मदत झाली. त्यांनी हिंदू धर्मातील कर्मकांड, बहुदेवतावाद यास विरोध केला. जातीयता मानली नाही. त्यांनी हरे कृष्णा म्हणजे विठ्ठलाची भक्ती केली. भारतभर तीर्थयात्रा करून आल्यानंतर 1296 मध्ये आळंदीस संजीवन समाधी घेतली. त्यांनी लिहिलेले चार ग्रंथ चार प्रकारचे संवाद मानलेले आहेत. ज्ञानेश्वरी ग्रंथ हा श्रोतसंवाद आहे, अमृतानुभव हा आत्मसंवाद आहे, चांगदेव पासष्टी हा मित्रसंवाद आहे, तर अभंगगाथा हा लोकसंवाद आहे. ज्ञानदेवांनी समाजात कर्म, ज्ञान, भक्ती यांचे व्यवस्थित प्रबोधन केले. ज्ञानेश्वरी ग्रंथाचे त्यांनी केलेले पसायदान म्हणजे मानवतेचे दिव्य प्रतीक होय.

**संत नामदेव:.**

संत नामदेवांनी महाराष्ट्राप्रमाणेच राजस्थान, पंजाब व हरियाणा या भागातही भागवत धर्माचा प्रसार केला. सतत वीस वर्षे त्यांनी हे भक्तिमार्ग चळवळीचे कार्य केले. त्यांचा जन्म इसवी सन 1270 मध्ये पंढरपूर येथे एका शिंपी कुटुंबात झाला त्यांच्या वडिलांचे नाव दामाशेट्टी तर आईचे नाव गोणाई होते. नामदेव विठ्ठल भक्त होते. त्यांचा वयाच्या अकराव्या वर्षी राजाई या मुलीशी विवाह झाला. परंतु संसारात त्यांचे मन रमले नाही. संत ज्ञानेश्वर व गुरु विसोबा खेचर यांच्या उपदेशामुळे त्यांची

भक्ती डोळस बनली. त्यांनी उत्तर भारतात भागवत धर्माचा प्रसार केल्यामुळे त्या ठिकाणी त्यांना हजारो शिष्ये मिळाली त्यांनी मराठी व हिंदी भाषेत शेकडो अभंग रचले आहेत. त्यांनी जात-पात कर्मकांड याला विरोध केला. समाजातील कोणत्याही माणसाला भक्तीचा अधिकार आहे हे त्यांनी सांगितले. त्यांच्या शिकवणीकडे बहुजन समाज आकर्षित झाल्याचे दिसून आले. नामदेवाचा देहांत पंढरपूर येथे झाला तरी पंजाबातील त्यांच्या अनुयायांनी घुमान या ठिकाणी त्यांचे विशाल स्मृतीमंदिर म्हणजेच गुरुद्वारा बांधले शिखांचा धर्मग्रंथ गुरुग्रंथ साहेबांमध्ये संत नामदेवांची अनेक हिंदी पदे समाविष्ट करण्यात आलेली आहेत ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

### संत एकनाथ:

इसवी सन 1528 ते 1599 हा संत एकनाथांचा कालखंड मानला जातो. संत एकनाथ सुद्धा भागवत धर्माचे एक आधारस्तंभ मानले जातात. ज्ञानेश्वरांनी प्रसारात आणलेले  वारकरी संप्रदायाची कार्य नामदेवानंतर जेव्हा थंडावले गेले आणि भक्ती संप्रदायावर जेव्हा विविध धर्मीयांचे आघात होत होते अशा परिस्थितीत भागवत धर्माचे पुनरुत्थान घडवून आणण्याचे कार्य संत एकनाथांनी केले. म्हणूनच त्यांना संस्कृतीरक्षक मानले जाते. त्यांनी मराठी भाषेला प्राधान्य प्राप्त करून दिले. संस्कृत भाषा व राज्यकर्त्यांच्या फार मराठी भाषेतून वाड्मय लिहिले.

### संस्कृत वाणी देवे केली / प्राकृत काय चोरापासून आली?

असा सवाल त्यांनी पंडितांना विचारून बहुजन समाजाला समजेल अशा मराठीतून अनेक ग्रंथ लिहिले. एकनाथी भागवत, भावार्थरामायण,  श्लोकी भागवत, रुक्मिणी स्वयंवर,  भारुडे,  गवळणी इत्यादी ग्रंथ त्यांनी लिहिले.  संत एकनाथांनी जातपात या  गोष्टींना विरोध केला. भारुडे व गवळणीतून त्यांनी समाजातील अंधश्रद्धा,  रुढी, अज्ञान यावर प्रहार केला व समाजाचे प्रबोधन करण्याचे काम केले.

### संत तुकाराम:

संत तुकारामांना भागवत संप्रदायाचा कळस मानतात. ते विठ्ठल भक्त होते जवळजवळ त्यांनी 4500 अभंग लिहिलेले आहेत त्यांनी आपल्या अभंगाद्वारे वारकरी संप्रदाय खेड्यापाड्यापर्यंत नेऊन पोहोचविला.  जातीपातीला  विरोध केला. रुढी, अंधश्रद्धा,  कर्मकांड,  शूद्र, देवतांचे पूजन यावर त्यांनी आपल्या अभंगातून टीका केली. विठ्ठलासारख्या देवाची भक्ती केल्यानंतर अन्य कोणत्याही शूद्रदेवतांची भक्ती करण्याची गरज नाही हे त्यांनी आवर्जून सांगितले. सामान्य व गरीब लोकांबद्दल त्यांना कळवळा होता म्हणूनच ते म्हणतात—

बुडती हे जन न देखवे डोळा / येतो कळवळा म्हणोनिया.

अज्ञान,  दारिद्र्य,  अंधश्रद्धा, चुकीच्या मूर्ख समजुती,  वाईट प्रथा यामध्ये अडकलेल्या समाजाबद्दल त्यांना कळवळा होता व आपल्या अभंगातून त्यांनी या लोकांना मार्गदर्शन करण्याचे काम केले.  तुकाराम गाथा  हा त्यांचा अभंगसंग्रह आहे. त्यानंतर ही परंपरा पुढे चालविण्याचे काम निळोबाराय व बहिणाबाई यांनी केले.

### संतांच्या कार्याचे मूल्यमापन:

वारकरी संप्रदायातील किंवा भक्तीपंथातील या संतांनी महाराष्ट्रात महत्वपूर्ण आणि प्रभावी असे धार्मिक, सामाजिक कार्य केले. लोकांमध्ये धार्मिक भावना वाढविली. यामुळे इस्लामच्या प्रचाराला आणि प्रसाराला आळा बसला शिवाय सामाजिक प्रबोधनाचे कार्य या संतांनी केले. हिंदू धर्मात निर्माण झालेल्या कर्मकांडास विरोध केला धर्मातील जुन्या बुरसटलेल्या कल्पना व अंधश्रद्धाळूपणा या संतांनी मोडून काढल्या. परमेश्वराजवळ सर्व व्यक्ती समान आहेत असे सांगून स्त्री-पुरुष शूद्र व चांडाळ या सर्वांना भक्ती करण्याचा अधिकार आहे असे सांगितले. जातीभेदाला विरोध केला भक्तीचा खरा मार्ग लोकांना समजावून सांगितला. वारकरी संप्रदायाने संस्कृत ऐवजी मराठी भाषा आपल्या लिखाणाचे माध्यम केले. त्यामुळे या संतांचे लिखाण आणि विचार समाजाला समजायला सोपे गेले. लोकांना आपल्या उणिवा, अंधश्रद्धा, मागासलेपणा कळून येऊ लागला समाजात हळूहळू का होईना पण सुधारणा होऊ लागल्या. या संतांनी प्रवृत्तीवादी भक्ती करण्यास समाजाला सांगितले. प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालणारा कर्मयोग शिकविला. त्यांनी वेदाला प्रामान्य मानले परंतु बुद्धिनिष्ठतेला प्रमाणभूत मानले. सामाजिक नीतिमत्तेची पातळी उंचवण्यासाठी दया, क्षमा, शांती यांच्या जोडीलाच सत्य आणि अहिंसा ही तत्वे या संतांनी शिकविली सर्व जातीतील संत या पंथात होऊन गेले. उपवास, यात्रा, विधी, कर्मकांड यापेक्षा ईश्वरावर दृढ भक्ती ठेवून भजन व नामस्मरण करण्याचे महत्त्व वाढविले. अनेक देवतावादापासून समाजाला रोखण्याचा प्रयत्न केला.

### संदर्भ ग्रंथ.

१) सरदार ग.बा. संतवाड्मयाची सामाजिक फलश्रुती, लोकवाड्मय ग्रह, मुंबई प्रशासन 2023
२) सुंठनकर .बा र. महाराष्ट्रीयन संतमंडळींचे कार्य. मुंबई 1994
३) पाटणकर विद्यासागर, एक विठ्ठल नाम: वारकरी संप्रदाय, साहित्य व तत्त्वज्ञान, विश्वकर्मा पब्लिकेशन, एप्रिल 2019
४) नसीराबादकर, ल. रा. प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, मार्च 2013
५) भालेराव प्रज्ञा, वारकरी संप्रदाय उदय व विकास, व्हिनस प्रकाशन, पुणे 1972
६) गोसावी रा. रा. पाच भक्ती संप्रदाय, प्रतिमा प्रकाशन, तृतीय आवृत्ती 2008